# सायबर पोलीस स्टेशन,अकोला

**<u>स्थानिक गुन्हे शाखा अकोला ची विशेष कामगीरी</u>**

दि.२९.०९.२०१८

**भारत विरुध्द बांग्लादेश एशिया कप या क्रिकेट सामन्यादरम्यान क्रिकेट सटट्याचा एकुण ७,६६,२५०/-रू.चा मुद्देमाल केला जप्त**

दि.२८/०९/२०१८ रोजी पोलीस उप निरिक्षक रणजीतसिंह ठाकूर सोबत सहा.पो.उपनि.दिनकर वामनराव बुंदे, पो.हे.कॉ.गणेश पांण्डे, पो.कॉ.आश्विन शिरसाठ,पो.कॉ.आशिष ठाकुर,पोकॉ फिरोज खॉन, म.पो.कॉ.गिता अवचार ,ड्रायव्हर पोहेकॉ संजय निखाडे यांनी गुप्त बातमीदाराच्या खात्रीलायक बातमीवरून पो.स्टे. बोरगाव मंजु हद्दीतील कैलास सिताराम अग्रवाल, वय ५८ वर्ष रा. बोरगाव मंजु यांचे घरी सुरू असलेल्या भारत विरुध्द बांग्लादेश एशिया कप या क्रिकेट सामन्यादरम्यान क्रिकेट सटट्यावर रेडकेली असता दिनेश घनश्यामदास पारवानी, वय ३६ वर्ष रा. सिंधी कॅम्प,अकोला व गिरीष विश्वनाथ गुप्ता,वय ४७ वर्ष,रा.रणपिसेनगर,जागृती विद्यालयजवळ अकोला यांचे जवळ क्रिकेट सटयाची खायवाडी लिहलेले दोन कागद, दोन पेन, ६ जुने वापरते मोबाईल कि.अ. ३३,०००/-रू.,एक एल.जी. कंपनीची एल.ई.डी. कि.अ.१५,०००/- रू.,दोन रिमोट कि.अ.००/-रू, सेटटॉप बॉक्स -१ कि.अ १,५००/-रू., एक इलेक्ट्रीक संच ब्रिफकेस माईकसह किं.अं.६०००/-रू. ,एक कि बोर्ड किं.अं.५००/-रू. व नगदी १०,२५० /- रू. व गुन्हयांचे साहित्य ने-आन करण्याकरिता घटनास्थळाच्या काही अंतरावर उभी असलेली आरोपी दिनेश घनश्यामदास पारवानी याचे मालकीची सिफट् डिझायर कंपनिची गाडी क्र.एम.एच. ३० एझेड ४३८९ किं.अं.७,०००००/-रू. असा एकुण ७,६६,२५०/-रू. चा माल मिळून आला वरून आरोपी नामे दिनेश घनश्यामदास पारवानी, वय ३६ वर्ष रा. सिंधी कॅम्प,अकोला यास विचारपुस केली असता सदरचा क्रिकेट सटटयाचा व्यवसाय हा अकोला येथील गिरीष गुरूबानी नावाच्या इसमाचा असुन तोच आम्हाला सदर व्यावसाय करण्याकरिता प्रोस्ताहीत करतो असे सांगितले वरून नमुद आरोपी नामे दिनेश घनश्यामदास पारवानी, वय ३६ वर्ष रा. सिंधी कॅम्प,अकोला, गिरीष विश्वनाथ गुप्ता,वय ४७ वर्ष,रा. रणपिसेनगर,जागृती विद्यालयजवळ ,अकोला व गिरीष गुरूबानी यांचे विरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४,५ व १०९ भा.द.वी .प्रमाणे पो.स्टे.बोरगाव मंजु जि.अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. जिल्हा पोलीस अधिक्षक अकोला श्री एम. राकेश कलासागर, याचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक श्री कैलास नागरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरिक्षक रणजीतसिंह ठाकूर सोबत सहा.पो.उपनि.दिनकर वामनराव बुंदे, पो.हे.कॉ.गणेश पांण्डे, पो.कॉ. आशिष ठाकुर ,पो.कॉ.आश्विन शिरसाठ,,पोकॉ फिरोज खॉन,म.पो.कॉ.गिता अवचार ,ड्रायव्हर पोहेकॉ संजय निखाडे यांनी पार पाडली.

**माहीतीस:**

**सर्व संपादक,**

-----------------------------------

स्थानिक गुन्हे शाखा अकोला